PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 3, ISSUE 4

# नागपूर विभागातील शहरीकरणाची प्रवृत्ती

**डॉ. जयंतकुमार एम. मस्के**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर
जि. भंडारा **महाराष्ट्र भारत**

**सारांश :**

शहरीकरण हे कोणत्याही क्षेत्राच्या विकासाच्या पातळीचे सुचक आहे. राज्याच्या शहरीकरणाची तुलना नागपूर विभागाशी करता नागपूर विभागाचे शहरीकरण कमी आहे. नागपूर विभागाच्या शहरीकरणात नागपूर जिल्हयाचे शहरीकरण जास्त आहे व आर्थिक विकासही याच जिल्हयात अधिक आहे. विभागातील इतर जिल्हयात तुलनात्मकदृष्टया शहरीकरण व आर्थिक विकास कमी आहे. म्हणून नागपूर विभागाचा समतोल विकास साधण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे.

**बीजशब्द (Keywords) :** शहरीकरण, आर्थिक विकास, दशक वृद्धी दर.

**प्रस्तावना :**

सन 1960 मध्ये नवनिर्मित महाराष्ट्रात विदर्भाचा समावेश झाला. त्यानंतर अनेक सर्वेक्षणातून, अभ्यासातून विदर्भातील विचारवंतांना असे जाणवले की, प्रगतीशील महाराष्ट्रात पाच दशक राहून सुद्धा विदर्भाचा आर्थिक विकास अतिशय मंदगतीने झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या भरभराटीच्या तुलनेत विदर्भाचे आर्थिक मागासलेपण प्रकर्षाने जाणवते. आर्थिक विकासाच्या बाबतीत असलेली प्रादेशिक असमानता हा केवळ महाराष्ट्र – विदर्भ विभागापूरताच मर्यादित प्रश्न नसून भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाची मुख्य समस्या आहे.[1] गेल्या पन्नास वर्षात बिहार, ओरीसा सारखी काही राज्ये आर्थिक दृष्टीने मागासलेलीच राहिली आहे. आर्थिक विकासातील प्रादेशिक विषमता प्रामुख्याने मर्यादित संसाधने असमानरीतीने वाटली जातात. गुंतवणूकीचे मूलतत्व जेथे चांगला परिणाम दिसेल तेथे खर्च करावा असे असल्याने विकसित भागांवर मर्यादित संसाधने विकासाचा निधी वापरण्याची प्रवृत्ती असते. त्यामुळे अविकसित भाग तसेच राहतात व विकसित भाग आणखी पुढे जातात. कालांतराने या

दोन भागात मोठी तफावत पडते. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात ही विषमता लक्षणीय आहे. शिवाय एखाद्या मागासलेल्या प्रदेशात काही भागसुद्धा जास्त मागासलेले राहू शकतात. आर्थिकदृष्टीने मागासलेल्या विदर्भात काही जिल्हे सुधारलेले तर काही जिल्हे अजुनही अप्रगत आहेत. म्हणून विदर्भाच्या आर्थिक विकासाचा विचार करतांना सर्व जिल्हयांचा समतोल विचार करणे आवश्यक ठरेल.

पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया हे जिल्हे नागपूर महसूल विभागात मोडतात. महाराष्ट्र राज्याच्या पूर्व भागातील नागपूर विभाग भारताचे मध्यवर्ती स्थान आहे. पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक महत्व असलेला नागपूर विभाग घनदाट जंगल व विपुल खनिज संपत्तीने समृद्ध आहे.

नागपूर विभागातील जिल्हयांच्या आर्थिक विकासात विषमता प्रकर्षाने आढळते. वर्ष 2010–2011 मध्ये चालू किमतीनुसार नागपूर विभागाचे दरडोई उत्पन्न 73,231 रूपये आहे व 2011 च्या जनगणनेनुसार नागपूर विभागातील शहरीकरणाची पातळी 42.14 टक्के आहे. 2010–11 सालचे चालू किमतीनुसार नागपूर जिल्हयाचे दरडोई उत्पन्न 96,458; चंद्रपूर जिल्हयाचे 67,641; वर्धा जिल्हयाचे 61,391; भंडारा जिल्हयाचे 57,094; गोंदिया जिल्हयाचे 50,042 व गडचिरोली जिल्हयाचे 43,058 एवढे आहे.[2] तसेच मानव विकास अहवाल 2012 नुसार नागपूर विभागातील फक्त नागपूर जिल्हयाचा समावेश राज्याच्या विकसीत जिल्हयामध्ये होतो.[3] यावरून नागपूर विभागातील विकासात किती मोठी विषमता आहे, हे स्पष्ट होते. त्याचबरोबर शहरीकरणाचा विचार करता 2011 च्या जनगणनेनुसार नागपूर जिल्हयाचे शहरीकरण 68.30 टक्के आहे. तसेच चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हयाचे शहरीकरण अनुक्रमे 35,.08, 32.47, 19,50, 17.07 व 11.00 आहे. यावरून नागपूर विभागातील जिल्हावार उत्पन्न व शहरीकरणाचे प्रमाण यांचा विचार करता असे दिसून येते की, नागपूर जिल्हयामध्ये शहरीकरणाचे प्रमाण व उत्पन्नाचे प्रमाण दोन्ही जास्त आहे. तर विभागातील इतर जिल्हयामध्ये शहरीकरणाचे प्रमाण व उत्पन्नाचे प्रमाण दोन्ही कमी आहे. म्हणजेच दरडोई उत्पन्न वाढीमध्ये शहरीकरणाची भूमिका महत्वाची आहे.

पायाभूत सोयीचा अभाव हे विदर्भाचा पहिल्या वीस वर्षात (1961–81) आर्थिक विकास अतिशय मंदगतीने व नगण्य स्वरूपात होण्याचे प्रमुख कारण आहे. असे असले तरी नंतरच्या काळात 1981–97 आर्थिक विकासाला गती मिळत गेली. याचे एक

कारण असे की, पायाभूत सोयी वाढत गेल्या.[4] वीज, पाणी, दळणवळण साधने, शिक्षण व आरोग्य सेवा अशा मूलभूत सोयी संपूर्ण समाजासाठी असतात. या सामूहिक सोयीमुळे आर्थिक विकासाला गती मिळते व त्यांच्या अभावी आर्थिक विकास मंदावतो. बहुतेक ग्रामीण भागात व लहान आकाराच्या शहरात या पायाभूत सोयी तुरळक असतात. महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या शहरात या सोयी चांगल्या प्रमाणात असल्याने या शहरात आर्थिक विकास झालेला दिसून येतो.[5]

**शहरीकरणाच्या पातळीचे मापन :**

नागरी भागातील लोकसंख्येच्या आकारमानानुसार शहरीकरणाच्या पातळीचे मापन केले जाते. त्याचबरोबर शहरी लोकसंख्येचा दशक वृद्धी दर व वार्षिक वृद्धी दर हा वाढणारा असावा असा एक निकष शहरीकरण पातळी मोजण्यासाठी घेण्यात येतो. एकाच प्रदेशातील दोन सलग जनगणनानुसार मिळालेल्या लोकसंख्या आकडेवारीवरून दशवार्षिक लोकसंख्या वाढीचा शेकडा दर काढता येतो त्याला दशकवृद्धी दर म्हणतात. खालील सुत्राच्या सहाय्याने दशकवृद्धी दर काढला जातो.[6]

$$r = \frac{P_1 - P_0}{P_0} \times 100$$

$P_0$ = आधीच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या

$P_1$ = नंतरच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या

$r$ = लोकसंख्या वाढीचा दशकवृद्धी दर

लोकसंख्येत दरवर्षी दर शेकडा कोणत्या दराने बदल होत आहे. याचे प्रमाण जनगणनाच्या आकडेवारीवरूनच काढावे लागते. यासाठी लोकसंख्या वाढीचा दशकवृद्धी दर काढल्यावर त्याला दोन जनगणना मधील अंतराने (म्हणजे दहाने) भागले की वार्षिक दर मिळतो. पण यापेक्षा वार्षिक दर काढण्यासाठी चक्रवाढ व्याज या गणिती पद्धतीने काढलेले आकडे जास्त अचूक असतात. वार्षिक चक्रवाढ वृद्धीदर काढणे सोपे जावे म्हणून लॉगरिथमच्या मदतीने खालील सूत्र वापरतात.[7]

$$\text{Log}\,(1 + r) = \frac{\text{Log}\,P_1 / P_0}{n}$$

$P_0$ = आधीच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या

$P_1$ = नंतरच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या

n = दोन जनगणनामधील कालखंड

r = लोकसंख्या वाढीचा वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर

वरील सूत्रांचा उपयोग करून नागपूर विभागातील दशवार्षिक वृद्धी दर व वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर काढण्यात आला आहे.

**नागपूर विभागातील शहरीकरणाची पातळी :**

1961 ते 2011 या कालखंडातील नागपूर विभागातील जिल्हावार शहरी लोकसंख्येचे प्रमाण, शहरी दशवार्षिक वृद्धी दर, वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहेत.

**नागपूर विभागातील शहरीकरणाची पातळी (टक्केवारीत)**

(लोकसंख्या हजारमध्ये)

| वर्ष | एकूण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | शहरीकरणाचे प्रमाण | लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धी दर | लोकसंख्येचा वार्षिक चक्रवाढ वृद्धी दर | शहरांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1961 | 4657 | 1177 | 25.27 | — | — | 29 |
| 1971 | 5946 | 1591 | 26.76 | 35.17 | 3.0 | 31 |
| 1981 | 7407 | 2266 | 30.59 | 42.43 | 3.5 | 38 |
| 1991 | 9020 | 3152 | 34.94 | 39.10 | 3.3 | 52 |
| 2001 | 10680 | 3988 | 37.34 | 26.52 | 2.3 | 60 |
| 2011 | 11734 | 4942 | 42.17 | 23.92 | 2.2 | 105 |

**आधार** 1. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हा, 2010.

2. Census of India 2011 – www.census2011.co.in provisional Population Total.

तक्त्यावरून नागपूर विभागाचे 1961 मध्ये 25.27 टक्के लोक शहरात राहत होते. हे प्रमाण सतत वाढत जाऊन 2001 व 2011 मध्ये अनुक्रमे 37.34 व 42.17 टक्के झाले. 1961 ते 2011 या दशकात नागपूर विभागातील शहरीकरणात 16.5 टक्के वाढ झाली. तसेच नागपूर विभागातील शहरांच्या संख्येचा विचार करता 1961 मध्ये नागपूर विभागात एकूण 29 शहरे होती. त्यात वाढ होऊन 2001 व 2011 मध्ये अनुक्रमे शहरांची संख्या 60 व 105 झाली. नागपूर विभागात वार्षिक वृद्धीदर 1971–81 या दशकात सर्वात जास्त 3.5 टक्के आणि 2001–11 या दशकात सर्वात कमी 2.2 टक्के राहिला आहे. 1981–91 या दशकात शहरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर सर्वात जास्त 39.10 टक्के राहिला आहे.

विभागातील नागपूर जिल्हयाचे शहरीकरण अधिक असण्याचे कारण या जिल्हयाचे स्थान औद्योगिकदृष्टया विदर्भात तसेच महाराष्ट्रात बरेच वरचे आहे. शिवाय नागपूर जिल्हयात नागपूर एक महानगर आहे. 1961 मध्ये नागपूर शहराची लोकसंख्या 6,43,659 होती ती वाढून 2011 मध्ये 24,05,665 पर्यंत वाढली आहे. म्हणजे या पाच दशकात नागपूर शहरात 17,62,006 लोकसंख्या वाढली आहे. नागपूर विभागाच्या 49 लाख एकूण शहरी लोकसंख्येत नागपूर शहराचा वाटा 24 लाख म्हणजे जवळजवळ 50.00 टक्के आहे. एकूणच नागपूर विभागातील शहरीकरणाची प्रवृत्ती नागपूर शहराभोवती केंद्रीत स्वरूपाची आढळते. नागपूर शहरातील रोजगाराच्या संधी, शिक्षणाच्या सोयी, राहणीमानाचा उच्च दर्जा या काही कारणामुळे लोकांचा ओढा या शहराकडे वाढत चालला आहे. त्यामुळे शहरातील लोकसंख्या वाढून उपलब्ध पायाभूत सोयी सुविधांवर ताण पडत आहे. अशा परिस्थितीत शहरातील जनतेच्या जीवनमानाचा दर्जा उंचावून त्यांचे जीवन अधिक सुसहय करण्यासाठी शासनाने शहराच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यास सुरवात केली आहे. त्यादृष्टीने या शहरातील महत्वाचा मिहान प्रकल्प लवकरच मार्गी लागणार आहे. केंद्र सरकारने अडीच हजार कोटी रूपये खर्च करून एम्स् ची निर्मिती करण्याची घोषणा केली आहे. राज्य सरकारने आय.आय. टी. स्थापन करण्याची घोषणा केली आहे. नऊ हजार कोटी रूपये खर्च करून मेट्रो प्रकल्प राबविण्यात येणार आहे. येत्या पाच वर्षात शहराला स्मार्ट सिटीत रूपांतर करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे पाचशे कोटी रूपये खर्च होणार आहेत. विभागातील चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया व गडचिरोली जिल्हे नागपूर जिल्हयाशी तुलना करता मागे आहेत. या जिल्हयातील अनेक वस्तीस्थानांचा शहर म्हणून विकास झालेला नाही. कारण या जिल्हयात जास्तीत–जास्त लोकसंख्या ही कृषी–व्यवसायात गुंतलेली असून

येथे बिगर–कृषी व्यवसायाचा विकास फारसा झालेला नाही. एकूणच अनेक मुलभूत सोयींनी समृद्ध असणारा व आर्थिक विकास अधिक असणारा नागपूर शहर आणि कमी मुलभूत सोयी व कमी आर्थिक विकास असणारे गडचिरोली सारखे शहर अशा दोन प्रवृत्ती विकासाच्या संदर्भात नागपूर विभागात आढळून येतात.

नागपूर विभागातील शहरीकरणाच्या वाढीवर सर्वात जास्त प्रभाव नागपूर जिल्हयाचा आहे, तर सर्वात कमी प्रभाव गडचिरोली जिल्हयाचा आहे. नागपूर जिल्हा जास्त शहरीकरण गटात येते व या जिल्हयाचे शहरीकरण नागपूर विभागाच्या तुलनेत खूप जास्त आहे. चंद्रपूर व वर्धा हे दोन जिल्हे मध्यम शहरीकरण गटात येतात व या जिल्हयाचे शहरीकरण नागपूर विभागाच्या शहरीकरणाच्या तुलनेत कमी आहे. तसेच भंडारा, गोंदिया, व गडचिरोली हे तीन जिल्हे कमी शहरीकरण गटात येतात व या जिल्हयाचे शहरीकरण नागपूर विभागाच्या शहरीकरणाच्या तुलनेत खूपच कमी आहे. महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012 नुसार विदर्भातील जिल्हयांमध्ये मागासलेपणाचे प्रमाण खूप जास्त आहे. विदर्भातील नागपूर जिल्हा सोडल्यास अन्य कोणताही जिल्हा मानव विकासाच्या संदर्भात राज्य सरासरीच्या बरोबरीला वा त्यापेक्षा अधिक निर्देशांक असलेला नाही.[8] या मागासलेल्या विदर्भात नागपूर विभागाचा समावेश होतो. या विभागात नागपूर जिल्हा प्रगत आहे. तर बाकी सर्व जिल्हे अप्रगत आहेत.

देशाच्या एकूण सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये शहरांची भूमिका खूप महत्वाची आहे. शहरे आपल्या देशाची संस्कृती, आचार विचार जगाला देत असतात. त्यावरून त्या त्या देशांचा विकासाचा आरसा निश्चित होतो. थोडक्यात शहरे ही आर्थिक विकासाची केंद्रबिंदु बनू लागली आहेत.[9] शहरीकरण प्रवृत्तीचा अभ्यास शहर गटाच्या संकल्पनेवरून करण्यात येते. जनगणना अहवालामध्ये 'अ' वर्ग (1,00,000 व त्यापेक्षा जास्त), 'ब' वर्ग (50,000 ते 99,999), 'क' वर्ग (20,000 ते 49,999), 'ड' वर्ग (10,000 ते 19,999), 'इ' वर्ग (5,000 ते 9,999), 'उ' वर्ग (5,000 किंवा त्यापेक्षा कमी) असे शहराचे लोकसंख्येच्या आकारमानानुसार गट पाडले जातात. 2001 च्या जनगणनेनुसार नागपूर विभागात एकूण नागरी लोकसंख्या 39,90,279 आहे. या एकूण नागरी लोकसंख्येमध्ये 'अ', ब', 'क', 'ड', 'इ' व 'उ' या वर्गाच्या शरात वास्तव्य करणा–या लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे 64.50, 10.24, 16.50, 6.66, 1.96, 0.06 टक्के आहे व या प्रत्येक वर्गातील शहरांची संख्या अनुक्रमे 4, 5, 21, 18, 11 व 1 आहे. नागपूर विभागात 'अ' वर्गाच्या 04 शहरात 64.50 टक्के लोकसंख्या आहे. तर बाकी

'ब', 'क', 'ड' 'इ' व 'उ' वर्गाच्या 56 शहरात 35.50 टक्के लोकसंख्या आहे. यावरून नागपूर विभागात शहरीकरणाची प्रवृत्ती मोठया शहरात जास्त व लहान शहरात कमी आहे.[10] 'अ' वर्गात येणा–या वर्धा, नागपूर, गोंदिया व चंद्रपूर या शहरात तुलनात्मकदृष्टया द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विकास झालेला आहे. त्यामळे या शहरामध्ये लोक रोजगार व्यवसायासाठी स्थलांतरीत झालेले आहेत.

**निष्कर्ष :**

नागपूर विभागातील प्रत्येक जिल्हयाच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, राजकीय, व्यापारिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्राच्या विकासात भिन्नता आहे. म्हणून या प्रत्येक जिल्हयाच्या शहरीकरण पातळीत भिन्नता आहे. म्हणून विभागाच्या संतूलित विकासाकरीता शहरीकरणाचे प्रमाण कमी असणा–या जिल्हयात सकारात्मक शहरीकरणाचे नियोजन करूण नकारात्मक शहरीकरणाच्या दुष्परिणामांवर कठोर नियंत्रण साधने आवश्यक आहे. विभागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी संभाव्य शहरे आणि गावांना त्याच्या क्षमतेनुसार विकसीत केले पाहिजे.

## संदर्भ :


1) वैद्य ए. बी. (2003) : ''विदर्भाची अर्थव्यवस्था'', श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर. P. 121.
2) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (2011–12), अर्थ व सांख्यिकी संचलनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. P. 32.
3) महाराष्ट्र मानव विकास अहवाल (2012), संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम.
4) वैद्य ए. बी., उपरोक्त. P. 89.
5) कित्ता. P. 115.
6) घारपुरे विठ्ठल (1999) : ''लोकसंख्या भूगोल'', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. P. 66.
7) किंत्ता. P. 67.
8) महाराष्ट्र मानव विकास अहवाल (2012), उपरोक्त.
9) देशपांडे सागर (2010) : ''महाखेडयांना जन्म देणारे वाढते शहरीकरण'', चाणक्य मंडळ परिवार (मासिक), पुणे. P. 18.
10) Census of India 2001.